लोकमत

# ‘महर्षी शिंदे’ यांच्यावर विशेष पाकीट

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अध्यासनच्या वतीने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीनिमित्त भारत सरकारच्या टपाल खात्याकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे विशेष पाकिटाचे अनावरण उद्या, सोमवारी, दि. २ जानेवारीला सिनेट सभागृहात सकाळी ११.३० वाजता होणार आहे. टपाल खात्याचे गोवा क्षेत्र, पणजीचे प्रमुख पोस्टमास्तर आर. के. जायभाये यांच्या हस्ते हा अनावरण समारंभ होणार आहे. छत्रपती शाहू महाराज तसेच नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. जनार्दन वाघमारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

पुण्यनगरी

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे विशेष टपाल तिकीट अनावरण समारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन, शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीनिमित्त भारत सरकारच्या टपाल खात्याकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे विशेष टपाल तिकीट अनावरणाचा समारंभ दि. २ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित केला आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित राहणार आहेत.

टपाल खात्याचे गोवा रिजन पणजीचे प्रमुख पोस्ट मास्तर आर. के. जायभाये यांच्या हस्ते अनावरण समारंभ होणार आहे, अशी माहिती महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील तसेच प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित राहणार आहेत.

तरूण भारत

# पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभाकरिता पदवी प्रमाणपत्र मागणी अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी १० जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यापूर्वीच्या निवेदनानुसार विद्यार्थ्यांना ३५० रुपये शुल्काने अर्ज भरण्याकरिता २९ डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि, विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार मुदतवाढ देण्यात आली आहे. आता अर्ज भरण्याकरीता ३५० रुपये शुल्कासह ५ जानेवारी आणि ८५० रुपये विलंब शुल्कासह १० जानेवारीपर्यंत ऑनलाईन अर्ज भरता येऊ शकणार आहेत. तरी ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप अर्ज भरलेला नाही, त्यांनी वाढवलेल्या मुदतीच्या वेळेत अर्ज दाखल करावेत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.